॥ खंड १० ॥
॥ अर्ज भाग ०१ ॥
॥ अरज नं. १७ ॥
॥ कृष्णपुरीची अरज ॥

## ॥ कृष्णपुरी महीमा भारी ॥

॥ कृष्ण पुरी महीमा भारी । कनवाळु आला, दयाळु आला ।
दयाळु आला, भाव भक्तीचा जिव्हाळा ॥ धृ ॥
॥ रूपी सावळा अंगी कळा । रंग धरून आला, देह धरून आला ।
देह धरून आला । नवल तो सांगे जगाला ॥
॥ नवल गाही धरली देही । आदी पुरूषानं ।
मिर्त लोकी उभा नामी । तारण जीवन ॥
॥ तारा साठी, अवतार येथी । धरला देवानं, पाहवं डोळ्यानं ।
या रायाच्या ओळखा खुणा । या स्थुल देहीत ॥
॥ ओळखा खुणा अवतार पुन्हा । धरला देवानं ।
या देहीचे मरण चुकतीन । याहीच्या हातानं ॥ ०५ ॥

॥ अर्ज भाग ०१ ॥
॥ अरज नं. १८ ॥
॥ कृष्णपुरीची अरज ॥

## ॥ नरदेहीवर सत्ता धन्याची ॥

॥ नरदेही वर सत्ता धन्याची । यवग भरले ।
अवतार घेवुन सारंगधर । सत्य बोलले ॥
॥ कारूणेचा सागर भरला । उभा ठाई ठाई ।
गोपाळाच्या पाठी बाप्पा । आधार तुया दयावा ॥
॥ हंकार वाणी देवा हरी । विनविता तुम्हा ।
तारो नामी ठेव बाप्पा । अशीच वासना ॥
॥ पुर्विचा लेश काही टळेना कोणाला ।
उभी साळुमाय पाजे अमृताचा पान्हा ॥
॥ फाटक्याचे धड तुम्ही करा अवधुता ।
भाकल्याचे गुण ऐसे बोलले पंडीता ॥ ०५ ॥

भजने :-
॥ अर्ज करतो पामर । या अर्जिला व्हावे सादर ॥
॥ अर्ज करतो लवुन । भेट दयाहो महाराजा येवुन ॥
॥ अर्ज करतो येथुन । पावन व्हावे महाराजा तेथुन ॥
॥ अर्ज ऐक लेकराची । नामी जडल्याची लज्जा राखा हो आमची ॥



॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥